थोडक्यात

रा.स्व. संघाचे वसंतराव बहुळकर यांचे निधन

पुणे : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक व ख्यातकीर्त चित्रकार सुहास बहुळकर यांचे वडील वसंतराव रामचंद्र बहुळकर यांचे वयाच्या १०२ वर्षी वृद्धापकाळामुळे मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी सकाळी येथे निधन झाले. ते बापू नावाने सर्वत्र ओळखले जात. संघ संस्थापक डॉ. हेडगेवारपासून तेआजच्या सरसंघचालकांना पाहिलेले व त्यांच्याशी परिचित असलेले ते दुर्मीळ स्वयंसेवक होत. वसंतराव यांच्या पार्थिवावर त्यांचे पुत्र सुहास यांनी अंत्यसंस्कार केले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून नातवंडे पतवंडे असा परिवार आहे.

सरकारच्या १८ वर्षे मुदतीच्या २ हजार कोटी रोख्यांची विक्री

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या अठरा वर्षे मुदतीच्या दोन हजार कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री दि. १६ मे, २०१९ रोजीच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदाराला एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी 'भारतीय रिझर्व्ह बँके'तर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् दि. २ एप्रिल रोजी संगणकीय प्रणालीनुसार, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

वरळी आणि अंधेरीतून ३७ लाखांचा मद्यसाठा जप्त

मुंबई : उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने वरळी आणि अंधेरी येथून मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी ३७ लाखांचा मद्यसाठा जप्त केला. लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथील गुन्ह्यात १४ लाख, ३९ हजार, १६० रुपये, तर वरळी येथील सफेलो हॉटेलसमोर २२ लाख, ८९ हजार, ४०० रुपये किमतीचा दारुबंदी गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सतीश शिवलाल पटेल (वय ३५) याला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे.

रमाबाई आंबेडकर नगरच्या 'झोपू योजने'ने घेतला वेग

झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातर्फे १० हजार झोपड्यांचे सर्वेक्षण

गायत्री श्रीगोंदेकर ◄ मुंबई, दि.२ :

'सर्वांकरिता परवडणारी घरे'अंतर्गत घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर येथील ३३.१५ हेक्टर क्षेत्राचा विकास करताना १६ हजार, ५७५ झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन कण्यात येणार आहे. या झोपडीधारकांच्या सर्वेक्षणाचे काम झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू आहे. हे काम गतीने सुरू असून आत्तापर्यंत दहा हजार झोपड्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असल्याची माहिती झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर येथील अंदाजित एकूण ३३१४९५.४४ चौ.मी. (३३.१५ हे.) इतक्या जागेचा विकास करून तेथील अंदाजे १६ हजार ५७५ झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या झोपड्यांच्या पुनर्विकासासाठी 'एमएमआरडीए' आणि 'एसआरए'मध्ये संयुक्त भागीदारी करार करण्यात आला आहे. ज्यामुळे या भागाचा सुनियोजित विकास होऊन तेथील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होणार आहे. या 'झोपडपट्टी पुनर्वसन योजने'मुळे पूर्व मुक्त मार्ग (इस्टन फ्री वे) विस्तार प्रकल्पाकरता लागणाऱ्या जमिनीचा काही भाग रमाबाई आंबेडकरनगर झोपडपट्टीने बाधित होणारी जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विनामूल्य उपलब्ध होणार आहे. त्यासोबतच या योजनेमुळे प्राधिकरणाला अंदाजे पाच हजार सदनिका उपलब्ध होणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून दि. १५ मार्च रोजी सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली. प्राधिकरणाच्या माध्यमातून येणाऱ्या टीमला स्थानिकांचे संपूर्ण सहकार्य मिळत असल्याने या सर्वेक्षणात गती मिळत असल्याचेही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

पाच टीम रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी परिसरात सर्वेक्षणासाठी जात असून या पाच टीममध्ये प्रत्येकी पाच सभासद आहेत. या टीम दिवसभरात ३५० ते ४०० कुटुंबांची माहिती जमा करतात. डिजिटल पद्धतीने आणि कागदपत्रांच्या छायांकित प्रति अशा दोन्ही पद्धतीचे कागदपत्रे 'एसआरए'च्या माध्यमातून जमा करून घेत आहेत. ही संपूर्ण माहिती आणि कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पात्रता निश्चिती करण्यात येणार आहे.

'आले रामराज्य भूवरी'

यंदा गिरणगावची शोभायात्रा ठरणार खास!

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गिरणगाव सांस्कृतिक प्रतिष्ठान (लालबाग-परळ) यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील भव्य शोभायात्रा आयोजित केली आहे. 'आले रामराज्य भूवरी' ही शोभायात्रेची यंदाची संकल्पना असून प्रभू श्रीरामचंद्रांची भव्य मूर्ती विशेष आकर्षण असणार आहे. मंगळवार, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ७ ते दुपारी १२ वा. या वेळेत शोभायात्रा निघेल. यात्रेचा आरंभ श्रीस्वामी समर्थ मठ, परळ रेल्वे वर्कशॉपपासून होईल, तर यात्रेचा समारोप चिंचपोकळी दक्षिण विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ - गिरणगावचा राजा येथे होईल. मराठमोळ्या पोशाखात, वाजतगाजत, जल्लोषात निघणाऱ्या शोभायात्रेसाठी मोठ्या संख्येने सर्वांना शोभायात्रेत सहभागी होऊन गिरणगावची शान वाढवण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रभू श्रीरामचंद्रांची भव्य मूर्ती (दुर्गामाता सार्वजनिक उत्सव मंडळ, परळ), बाहुबली हनुमान, श्रीराम मंदिर प्रतिकृती (म्हसोबा मंदिर समिती), प्रभू श्रीरामचंद्रांचा चित्ररथ-भगवाधारी महिलांचे पथसंचलन (स्वयंसिद्धा महिला मंडळ, परळ), महिला लेझीम पथक (दुर्गामाता सा. उ. महिला मं./काळेवाडी महिला मंडळ), मर्दानी खेळ (पारंपारिक), ढोल पथक (पारंपरिक), भारतमाता पालखी, श्रीराजा शिवछत्रपती चित्ररथ, दुचाकी संचलन या सर्व गोष्टी शोभायात्रेतील खास आकर्षण असतील, अशी माहिती गिरणगाव सांस्कृतिक प्रतिष्ठान (लालबाग-परळ) चे अध्यक्ष शशिकांत दळवी यांनी दिली. यासंबंधी अधिक माहितीसाठी प्रवीण राणे (९७७३६६१२९३), विजयकुमार मिश्रा (९९३०२९८७८७), सुनील चुडनाईक (९७७३२७१८७८) यांना संपर्क करता येईल.

नववर्ष यात्रा कार्यक्रमात डॉ. शेवडे यांचे व्याख्यान

मुंबई, दि. २ : वृत्तसंस्था

कुर्ल्यात नववर्ष स्वागत यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा कुर्ला येथे होणाऱ्या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते, प्रवचनकार आणि साहित्यिक डॉ. सच्चिदानंद शेवडे हे प्रमुख वक्ते राहणार आहेत.

यंदाच्या वर्षी नववर्ष स्वागत यात्रेच्या माध्यमातून 'मंदिरे हीच राष्ट्रमंदिरे' या संकल्पनेअंतर्गत मंदिरांचे आपल्या देशातील धर्म आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठीचे योगदान मांडले जाणार आहे.

या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ७ एप्रिल रोजी सायंकाळी ६.०० वाजता कुर्ला पश्चिम येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, न्यू मिल रोड या स्थानी हे व्याख्यान होईल. या निमित्ताने कुर्ल्यातील सर्व प्रमुख मंदिरांचा सत्कार करण्याचे नववर्ष यात्रा समितीने योजिले आहे.

सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने व्याख्यानाला उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती च्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९५२४४०००७० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचे 'बूथ विजय' अभियान

विश्वास पाठक यांची माहिती; प्रत्येक बूथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत 'अब की बार ४०० पार' ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी भाजपने प्रत्येक बूथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार केला आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी दिली.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. पाठक म्हणाले की, ''बूथ विजय अभियान बुधवार, दि. ३ एप्रिलपासून सुरू होणार असून ते सहा दिवस चालणार आहे. विधानसभा पातळीवर पक्षाच्या बूथ स्तरीय कार्यकर्त्यांचे तसेच पन्ना प्रमुखांचे मेळावे या अभियानात आयोजित केले जाणार आहेत. मागील तीन निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचा आढावा घेऊन यावेळच्या निवडणुकीसाठी मतदानाचे उद्दिष्ट निश्चित केले जाणार आहे. या अभियानात प्रत्येक बूथवर मागच्या निवडणुकीपेक्षा ३७० मते वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. या अभियानात समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य आहे, असेही पाठक यांनी नमूद केले.

असे असेल नियोजन

- घरोघरी पत्रके पोहोचवून मतदारांशी थेट संपर्क साधणे. प्रत्येक घर, वाहनांवर स्टिकर्स लावणे. लाभार्थींशी नियमित संपर्कात राहणे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपचा झेंडा लावणे. आदी उपक्रम राबवले जातील. युवा वर्ग, महिला अशा समाजातील विविध घटकांसाठी पाच समूह बैठकाही घेण्यात येतील.
- भाजपशी संबंधित नसलेल्या मतदारांपर्यंत मोदी सरकारचे कार्य व योजना पोहोचवून भाजपला मत देण्यासाठी त्यांचे मन वळवण्याकरता विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.
- बूथपासून दूर राहणाऱ्या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येईल. तसेच, जिथे महायुतीचा उमेदवार असेल तिथे पक्षाची मते महायुती उमेदवारालाच जातील, याकडे विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे विश्वास पाठक यांनी सांगितले.

संकल्प पत्रासाठी भाजप घेणार मुंबईकरांच्या सूचना

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीसाठी मुंबईकरांच्या अपेक्षा, सूचनांसह भाजपाचे संकल्प पत्र तयार करण्यात येणार आहेत. गुगल फॉर्ममध्ये या सूचना घेण्यात येणार असून मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेतील मुंबईच्या लोकसभेचा जाहीरनामा तयार करताना मुंबईकरांच्या थेट सूचना भाजपकडून गोळा करण्यात येत आहेत. त्यासाठी रेल्वे स्टेशन, भाजप कार्यालये व ठिकठिकाणी सूचना पेट्या ठेवण्यात आल्या आहेत. या माध्यमातून १५ हजारांपेक्षा जास्त सूचना गोळा झाल्या आहेत. यामध्ये अधिकाधिक मुंबईकरांना आपल्या सूचना देता याव्यात म्हणून गुगल फॉर्मवर ही मोहीम राबविली जाणार आहे. भाजपचे नऊ हजार बुथ प्रमुख आपल्या मोबाईलवरून हा गुगल फॉर्म मुंबईकरांपर्यंत पोहोचवणार आहेत. याप्रसंगी आमदार अमित साटम, कालिदास कोळंबकर, तमिल सेलवन, प्रसाद लाड आणि भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आशिष शेलार म्हणाले की, ''मी मुंबई १ कोटी, ४० लाख मुंबईकरांना आवाहन करतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्प यात्रेत सहभागी व्हा. मुंबईबाबतच्या नव्या कल्पना, सूचना मांडा. आपण मांडलेल्या सूचना आम्हाला काम करताना प्रेरणादायी ठरतील.''

मामाच्या गावाला जाऊया... उन्हाळी हंगामासाठी एसटीच्या जादा गाड्या

मुंबई, दि. २ : विशेष प्रतिनिधी

राज्यात परीक्षांचा हंगाम अंतिम टप्प्यात असताना आता सर्वांनाच उन्हाळी सुट्टीचे वेध लागले आहेत. उन्हाळी सुट्टीत विद्यार्थ्यांचा मामाच्या गावाला जाण्याची, नोकरदारांचा गावाकडे येण्याची ओढ असते. याकाळात काही जण छोट्या सहलींचेही नियोजन करतात. यासाठी राज्य

परिवहन महामंडळाने यंदाही जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. या गाड्या बुधवार, दि. १० एप्रिल ते १६ जून याकालावधीत वेळापत्रकानुसार धावतील, अशी माहिती महामंडळाने दिली आहे.

महामंडळाने राज्याच्या विविध विभागातून दि. १५ जूनपर्यंत सुमारे १०८८ जादा बस विविध ठिकाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या हंगाम कालावधीत प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी आगाऊ आरक्षणाची सुविधा उपलब्ध केली आहे. यामध्ये राज्याच्या महसुली विभागानुसार, मराठवाडा विभागातून २४९ गाडचा, कोकण मधून २११ गाड्या, अमरावती विभागातून ५१ गाड्या, नागपूर विभागातून ४६ गाड्या, नाशिक विभागातून १९९ गाड्या तर पश्चिम महाराष्ट्र विभागातून ३३२ गाड्या उन्हाळी हंगामासाठी अतिरिक्त सोडण्यात येतील.

■ अमरावती विभाग		नांदेड	१८
अकोला	१३	धाराशिव	२४
अमरावती	०१	परभणी	५७
बुलडाणा	३७	**■ नाशिक विभाग**	
■ मराठवाडा विभाग		अहमदनगर	६३
संभाजीनगर	४८	धुळे	४०
बीड	६६	जळगांव	३९
जालना	२२	नाशिक	५७
लातूर	१४	**■ नागपूर विभाग**	
भंडारा	०५	सांगली	७२
चंद्रपूर	१३	सोलापूर	८६
गडचिरोली	११	**■ कोकण विभाग**	
नागपूर	०८	मुंबई	१४
वर्धा	०९	पालघर	२८
■ पश्चिम महाराष्ट्र विभाग		रायगड	२८
कोल्हापूर	८३	रत्नागिरी	८६
पुणे	६३	सिंधुदुर्ग	२०
सातारा	२८	ठाणे	३५

विद्यापीठाच्या कुलगुरुंची चौकशी करा! राज्यपालांकडे मागणी

मुंबई, दि. २ : वृत्तसंस्था

'कोटी विद्या चॅरिटेबल ट्रस्ट'चे अलमोरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नोलॉजी यांच्यासोबत आर्थिक हितसंबंध असल्याच्या संशयाप्रकरणी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू अजय भामरे आणि कुलसचिव बळीराम गायकवाडे त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मुक्ता शिक्षक संघटनेने राज्यपालांकडे केली आहे.

'कोटी विद्या चॅरिटेबल ट्रस्ट'चे अलमोरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नोलॉजी, सापगाव, ता. शहापूर ठाणे या महाविद्यालयाच्या विरोधात अनेक सामाजिक संघटना विद्यार्थी पालक व शासकीय यंत्रणा यांनी मुंबई विद्यापीठासह पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी नोंदवल्या आहेत. परंतु, मुंबई विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयाच्या संस्थाचालकांचा बचाव करण्यासाठी वेळकाढू धोरण स्वीकारले आहे. मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयाच्या संस्थाचालकांना यापूर्वी देखील राष्ट्र सेवेची संधी देण्याच्या नावाखाली मोकळीक दिल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

तसेच भविष्य निर्वाह निधी संघटन ठाणे कार्यालयाने अद्यापपर्यंत उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या व माहितीच्या आधारे २००९ ते २०२० या काळात या संस्थेच्या संचालक मंडळाने १ कोटी, २ लाख, ४१ हजार, ६०० रुपये इतक्या रकमेचा घोटाळा केल्याबाबत चौकशीत नमूद केले.

महानगरपालिकेचे सहआयुक्त रमेश पवार यांचा निरोप समारंभ

मुंबई, दि. २ : वृत्तसंस्था

मुंबई महानगरपालिकेचे सहआयुक्त (विशेष) रमेश पवार हे रविवार, दि. ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले. कनिष्ठ अभियंता ते सहआयुक्त असा तब्बल ३७ वर्षे प्रशासकीय प्रवास केलेल्या पवार यांना महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने गुरुवार, दि. २८ मार्च रोजी समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.

महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या सोहळ्यात पवार यांच्या कारकिर्दीचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. महानगरपालिका आयुक्तांच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारंभात आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्यासह विविध सहआयुक्त, उपायुक्त, संचालक, साहाय्यक आयुक्त आणि खाते प्रमुख उपस्थित होते. पालिका आयुक्तांचे उपायुक्त म्हणून पवार यांची कारकिर्द संस्मरणीय ठरली. महाराष्ट्र शासनानेदेखील त्यांची मार्च २०२२ ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत नाशिक महापालिका आयुक्त या पदावर प्रतिनियुक्ती केली. तेथे गोदावरी नदी प्रदूषणमुक्त आणि अतिक्रमणमुक्त करण्यासाठी दहा कलमी कार्यक्रम तयार करून त्याचा पवार यांनी शुभारंभ केला. तसेच अतिरिक्त पालिका आयुक्त म्हणून देखील त्यांनी अतिरिक्त कार्यभार सांभाळला. पवार यांना स्वच्छ अभियान पुरस्कार, महापौर चषक, संत गाडगे महाराज स्वच्छता पुरस्कार, पालिका आयुक्तांची प्रशस्तिपत्र यासह इतर पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

मुंबईत दुर्मीळ तिरंदाज पक्ष्याचे दर्शन

मुंबई, दि. २ : विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेमार्फत रविवार, दि. ३१ मार्च रोजी आयोजित केलेल्या बर्ड ट्रेलमध्ये दुर्मीळ तिरंदाज पक्ष्याचे दर्शन झाले आहे. मुंबईतील पक्षी निरीक्षकांसाठी भांडुप पम्पिंग स्टेशन आणि ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य येथे ही ट्रेल निशुल्क आयोजित करण्यात आली असून या ट्रेलदरम्यान दुर्मीळ तिरंदाज पक्ष्याचे पक्षिनिरीक्षकांना दर्शन घडले आहे.

महाराष्ट्र पक्षिमित्रचे कार्याध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बर्ड ट्रेल घेतली गेली असून ५५ पक्षी निरीक्षक या ट्रेलमध्ये सहभागी झाले होते. डॉ. राजू कसंबे यांच्याबरोबरच आदेश

शिवकर, फ्रान्सिस डिसुझा, ऋषिकेश घोगरे यांनीही यावेळी सहभागींना मार्गदर्शन केले. दरम्यान, एकूण ६० पेक्षा अधिक पक्षी प्रजातींची या ट्रेलमध्ये नोंद करण्यात आली.

यामध्ये मुंबई परिसरात दुर्मीळ असलेला तिरंदाज पक्षी (ओरिएन्टल डार्टर), तसेच दोन्ही प्रजातींचे फ्लेमिंगो पक्षी (मोठा रोहित व छोटा रोहित), स्थलांतरित पक्ष्यांपैकी निळ्या शेपटीचे वेडे राघू, कळेदार सुरय (व्हिस्कर्ड टर्न), कुरव चोचीच सुरय (गल-बिल टर्न), ठिपके वाली तुतारी (वूड सँडपाईपर) आणि चिखली तुतारी (मार्श सँडपाईपर), सामान्य टिलवा (कॉमन रेडशांक) व भुवई बदक (गार्गनी) इत्यादी स्थलांतरित पक्ष्यांचा समावेश होता. तिरंदाज आययुसीएनच्या यादीत निअर थ्रेटंड (धोक्याच्या जवळ असलेली) प्रजात म्हणून वर्गीकृत आहे. गेल्या अनेक वर्षात तिरंदाज या पक्ष्याच्या अगदी क्वचित नोंदी आढळल्यामुळे देखील एक दुर्मीळ नोंद आहे.

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता
संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेड**
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	८ ऑगस्ट, २००२
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक - मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	सीआयएन: L45200MH2002PLC136779
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	**नोंदणीकृत कार्यालय:** २१०२, २१ वा मजला, प्लॉट-६२, केसर इक्विनॉक्स, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व) एनए मुंबई शहर महा. ४०००१४ भारत. **प्रमुख कार्यालय:** बी१-४०६, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडियोजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००७२.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक	**२८.०३.२०२४** (आदेशाची प्रत दि. ०२.०४.२०२४ रोजी प्राप्त)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	**२४.०९.२०२४** (दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याच्या दिनांकापासून १८० वा दिवस)
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचा नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	**रविंद्र कुमार गोयल** **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP-P-02019/2020-2021/13098 **एएफए वैधता** ०८.०५.२०२४ **पर्यंत**
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	**पत्ता:** ईडन I-८०७, एस जी हायवे, गोदरेज गार्डन सिटी, जगत पुरा, अहमदाबाद, गुजरात-३८२४७०. **ईमेल:** ravindra1960_goyal@yahoo.co.in
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	**मार्केट रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी,** बी-२९, एलजीएफ, लजपत नगर-III, दिल्ली ११००२४ **ईमेल:** CIRP.MEPIDL@GMAIL.COM
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	**१६.०४.२०२४** (आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १४ वा दिवस)
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २९ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास.	लागू नाही
१३.	वर्गामध्ये कर्जदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे)	लागू नाही
१४.	अ) संबंधित अर्ज आणि ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल :	अ) वेब लिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads ब) लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दिनांक २८.०३.२०२४** रोजी **एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडची** कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. (आदेशाची प्रत दि. ०२.०४.२०२४ रोजी प्राप्त)

एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडच्या कर्जदारांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १६.०४.२०२४** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे. वित्तीय कर्जदार यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व कर्जदार त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे (वर्ग नमूद करावा) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

रविंद्र कुमार गोयल
एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडकरिता अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02019/2020-2021/13098
ईमेल: ravindra1960_goyal@yahoo.co.in, cirp.mepidl@gmail.com
एएफए वैधता ०८.०५.२०२४ **पर्यंत**

दिनांक: ०२.०४.२०२४
ठिकाण: अहमदाबाद
पत्ता: ईडन I-८०७, एस जी हायवे, गोदरेज गार्डन सिटी, जगत पुरा, अहमदाबाद, गुजरात-३८२४७०.